# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.08.2025** **वार- मंगळवार**

---

## स्वातंत्र्यदिन लष्कर

देशाच्या ७९व्या स्वातंत्र्यदिनाचं औचित्य साधून, तीनही सशस्त्र दलांनी तसंच तटरक्षक दलानं देशभरातील विविध शहरांमध्ये विशेष बँड सादरीकरणाचं आयोजन केलं आहे. पुण्यातील शनिवारवाडा आणि गांधी राष्ट्रीय संग्रहालयाच्या परिसरातही बँड सादर केला जाणार आहे. युवा पिढीला आपल्या देशाच्या अभिमानास्पद वारशाची ओळख करून देणं तसंच स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान करण, देशभक्तीची भावना जागृत करणं आणि ऑपरेशन सिंदूरच्या यशाचा उत्सव साजरा करण्याच्या उद्देशानं या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

## महाब्लड सेंटर

आगामी काळात पुणे महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या हद्दीमध्ये मोफत थॅलेसेमिया उपचार केंद्र सुरू करण्याचा प्रयत्न करणार असल्याची ग्वाही केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. लष्कर परिसरातील महात्मा गांधी रस्त्यावरील श्वास फाउंडेशन संचलित महाब्लड सेंटर

आणि थॅलेसेमिया उपचार केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते नुकतेच बोलत होते. अवयवदान पंधरवड्याच्या निमित्ताने मोहोळ यांनी अवयवदानाचा संकल्प यावेळी केला. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी चित्रफीत संदेश पाठवून या केंद्राला शुभेच्छा दिल्या.

**रक्तदान**

पुण्याचं ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंडळानं आयोजित केलेल्या वार्षिक रक्तदान शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात 218 जणांनी रक्तदान करत सामाजिक भान जपलं.

**प्रधानमंत्री पीक विमा**

प्रधानमंत्री पीक विमा सुधारित योजनेत सहभागी होण्यासाठी बिगर कर्जदार शेतकऱ्यांना येत्या 14 ऑगस्टपर्यंत आणि कर्जदार शेतकऱ्यांना येत्या 30 ऑगस्टपर्यंत विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रेय गावसाने यांनी दिली. तांत्रिक व्यत्ययामुळे शेतकऱ्यांच्या योजनेतील सहभागावर होणारा परिणाम लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

**सौरऊर्जा**

सौरऊर्जा प्रकल्पाची कामं वेळेत कार्यान्वित करावीत, अन्यथा संबंधितांना पुढच्या पाच वर्षांसाठी काळ्या यादीत टाकलं जाईल, असा इशारा ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी दिला आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कृती दलाच्या बैठकीत त्या बोलत होत्या.

**वृक्षलागवड**

राज्य सरकारने पुणे महापालिकेला सप्टेंबर अखेरपर्यंत एक लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट दिले होते. त्या अंतर्गत आतापर्यंत 41 हजार झाडे लावण्यात आली आहेत. त्यातील 11 हजार 620 झाडे महापालिकेच्या पथ विभागाने लावली आहेत. पुणे महापालिकेतर्फे वृक्षलागवड मोहिमेंतर्गत 15 क्षेत्रीय कार्यालये, उद्यान विभाग, मालमत्ता व्यवस्थापन आणि पथ विभागाकडून जागांची माहिती मागविण्यात आली होती. या ठिकाणी वृक्षलागवड केली जाणार आहे.

**खासगी रुग्णालयांना नोटीस**

पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने सात खासगी रुग्णालयांना वेगवेगळ्या त्रुटींबाबत कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे. यामध्ये कसबा पेठ, घोले रस्ता, कोथरूड इथल्या प्रत्येकी एक तर औंध क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील चार अशा सात रुग्णालयांचा समावेश आहे. दरपत्रक, रुग्णहक्क संहिता, टोल फ्री क्रमांक अशा विविध निकषांवर रुग्णालयांची तपासणी केली जाते. तसंच रुग्णांच्या तक्रारीवरूनही

नोटीस पाठवण्यात येते. अशी माहिती सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर यांनी दिली.

**<u>गंगवाल</u>**

फुफ्फुसातील आजाराला कारणीभूत ठरणाऱ्या कबुतरांना अनियंत्रित दाणे टाकणे टाळायलाच हवे," अशी स्पष्ट भूमिका पुण्यातील शाकाहार आणि अहिंसावादी कार्यकर्ते, सर्वजीव मंगल प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. कल्याण गंगवाल यांनी मांडली. मानवी वस्त्यांमधील कबुतरखान्यांचे स्थलांतर करावे, अशी सूचनाही त्यांनी केली.

**<u>पुरस्कार</u>**

राजस्थानातल्या श्री कल्पतरू संस्थेतर्फे पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते, पद्मा प्रतिष्ठान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष समितीचे संस्थापक शशिकांत कांबळे यांना 'वृक्षमित्र राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. जयपूर इथल्या इन्स्टिट्यूट ऑफ ऍग्रीकल्चर मॅनेजमेंट दुर्गापूरा इथं आयोजित सोहळ्यात राजस्थानचे नगरविकास राज्यमंत्री झाबरसिंह खर्रा यांच्या हस्ते शशिकांत कांबळे यांना हा पुरस्कार देण्यात आला.

**<u>क्रीडा</u>**

मुलींच्या वरिष्ठ गटाच्या राज्य स्तरावरील फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा पालघर इथं सुरू आहेत. या स्पर्धेत पुणे जिल्हा संघाने ठाणे जिल्हा संघाचा ६-१ असा सहज पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली. रितीका सिंग, आदिती गोडेकर आणि पूर्वा गायकवाड यांनी गोल करत पुण्याचा विजय साकार केला. या स्पर्धेत 20हून अधिक जिल्हा संघांनी भाग घेतला आहे. स्पर्धेचा अंतिम सामना 15 ऑगस्ट रोजी होणार आहे.

**पुरस्कार**

पुण्याच्या डॉक्टर शर्वरी इनामदार यांनी कोझिकोड इथं झालेल्या 'मास्टर क्लासिक आणि इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग' स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. स्पर्धेत त्यांनी महाराष्ट्रासाठी सात सुवर्णपदकं आणि एका रौप्य पदकाची कमाई केली. या कामगिरीमुळे 10 ते 19 ऑक्टोबर दरम्यान केप टाऊन इथं होणाऱ्या जागतिक भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 28 आणि किमान तापमान 21 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल, तसंच हलक्या पावसाचाही अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**